# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.
PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102
Telegram : Edutech E-Mail : system@dte.org.in Website: http://www.dte.org.in


क्रमांक ३/अ.स./२०१०/२६५
दिनांक :- १०/११/२०१०.

## अधिसूचना

महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागातर्फे अल्पसंख्यांक समुदायाकरिता रोजगाराभिमुख प्रशिक्षण फी प्रतिपूर्ती योजना २०१०-११ करिता लागू करण्यात आलेली आहे. शासकीय तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालये येथील निरंतर प्रशिक्षण योजना, तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ मुक्त विद्यापीठ यांच्या मान्यतेने चालविण्यात येणारे विविध अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या मुस्लिम, शिख, बौध्द, जैन, ख्रिश्चन व पारशी या समुदायाच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती म्हणून प्रत्यक्ष शुल्क किंवा रुपये ४ हजार या पैकी जी कमी असेल एवढी रक्कम अदा करण्यात येईल. यासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

योजनेच्या अटी व शर्ती.

- विद्यार्थी मुस्लिम, शिख, बौध्द, जैन, ख्रिश्चन व पारशी या समुदायाचा असावा.
- विद्यार्थ्याचे वार्षिक उत्पन्न रुपये २.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे.
- विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
- ३०टक्के जागा मुलींसाठी राखीव

अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे

- विद्यार्थ्याची स्वतःची स्वाक्षरी असलेले पासपोर्ट आकाराचे छायाचित्र प्रत.
- शालांत परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत.
- विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचा पुरावा उदा.शिधापत्रिकेची प्रत / वीज, दूरध्वनी देयकाची प्रत / पारपत्राची प्रत/ निवडणुक ओळखपत्राची प्रत यापैकी कोणतेही एक.
- धर्माचे प्रमाणपत्र किंवा धर्माची नोंद असलेला शाळा सोडल्याचा दाखला/न्यायिक स्टॅम्पपेपर वरील घोषणापत्र.

पात्र विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यामध्ये अर्ज भरुन आवश्यक कागदपत्रांसह प्रशिक्षण घेत असलेल्या संस्थाप्रमुखांकडे सादर करावा. अर्जाचा नमुना www.dte.org.in/mcm या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज प्राचार्यांकडे सादर करण्याचा अंतिम दिनांक ३०/११/२०१० हा राहील. संस्थाप्रमुखांनी सदर अर्ज थेट संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचेकडे दिनांक ८/१२/२०१० पर्यंत सादर करावा. निवड झालेल्या

उमेदवारांची यादी संचालक तंत्र शिक्षण www.dte.org.in/mcm या संकेतस्थळावर प्रसिध्द करतील. अधिक माहितीकरिता ०२२-२२६१७९६९ येथे संपर्क साधावा. खालील अभ्यासक्रमाचा या योजनेमध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

१) महाराष्ट्र स्टेट सर्टिफिकेट कोर्स इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (एमएससीआयटी) २) सर्टिफिकेट कोर्स इन फौड्री टेक्नॉलॉजी ३) सट्रिफिकेट कोर्स इन फिलोक्साग्राफिक प्रिंटींग/ऑफसेट प्रिंटींग/स्क्रिन प्रिंटींग ४) सर्टिफिकेट कोर्स इन एम्बेडेड सिस्टिम ५) सर्टिफिकेट कोर्स इन एनर्जी मॅनेजमेंट अॅण्ड ऑडिट ६) कॉम्प्युटर हार्डवेअर मेंटेनन्स ७) कॉम्प्युटर नेटवर्कीग ८) लॅपटॉप मेंटेनन्स ९) मोबाईल मेंटेनन्स १०) फॅक्स/ प्रिंटर/ कॉम्प्युटर मेंटेनन्स ११) प्रोग्रॅमेबल लॉजिक कंट्रोलर (पीएलसी) १२) पी.सी.बी.डिझाईन १३) ए.एस.पी नेट प्रोग्रॅमिंग १४) जावा/ अॅडव्हान्स जावा / सी प्रोग्रॅम इ. १५) कोरल ड्रॉ पेज मेकर / फोटोशॉप इलस्ट्रेटर १६) अॅनिमेशन/मल्टीमिडीया/वेब डिझाईनिंग १७) ऑटोकॅड/कॅटीया १८) एनएक्स -४ १९) मॅटलॅब २०) बुक बाईंडिंग २१) अॅडव्हान्स ऑटोमोटीव कोर्स २२) एअरक्राफट मेंटेनन्स २३) फूट वेअर डिझाईन २४) हॉटेल मॅनेजमेंट अॅण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, ट्रॅव्हल अॅण्ड टूरिझम २५) ड्रेस डिझाईन अॅण्ड फॅशन टेक्नॉलॉजी २६) शासकीय कला महाविद्यालयातील अल्पमुदतीचे प्रमाणपत्र / व्यावसायिक अभ्यासक्रम २७) राज्य शासनाच्या पदवी व पदविका संस्थामधील अल्पमुदतीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम.

( डॉ. सु. का. महाजन )
प्र. संचालक तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई